रेशीम शेती व उद्योग प्रचार व प्रसिध्दी योजना...
निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक : पुरक - २०१८/प्र. क्र.१३६/रेशीम कक्ष
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १५ मार्च, २०१९

वाचा-

१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय, कमांक : प्रावियो - १०१८/ प्र. क्र. १९/ रेशीम कक्ष, दिनांक १८ एप्रिल, २०१८
२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय, क्रमांक. पुरक २०१८/प्र.क्र.७१/रेशीम कक्ष दि. १० सप्टेंबर, २०१८
३) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय अनौपचारीक संदर्भ क्रमांक-६०३८ दि.२३.१०२०१८
४) संचालक (रेशीम) यांचे पत्र क्रमांक कार्या. १०/ प्रचार प्रसिध्दी/आराखडा/१९/२३२९, दिनांक १६.२.२०१९
५) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३ दि. २५.०१.२०१९

प्रस्तावना-

रेशीम शेती व उद्योगाला चालना देण्यासाठी राज्यव्यापी प्रचार व प्रसिध्दी देण्याची योजना संदर्भाधिन दि. १८.४.२०१८ च्या शासन निर्णयान्वये हाती घेण्यात आली आहे. रेशीम शेती व उद्योगाला चालना देण्यासाठी विविध दृकश्राव्य माध्यमातून करण्यात येणाऱ्या प्रचारावरील खर्च भागविण्यासाठी संचालक(रेशीम) यांच्या संदर्भाधिन दि. १६.२.२०१९ च्या पत्राव्दारे प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाला निधी वितरीत करण्यासाठी संचालक (रेशीम) यांचे अधिनस्त सुपूर्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.२५.०१.२०१९ नुसार कार्यक्रम खर्चाच्या बाबींवर अर्थसंकल्पीत वार्षिक तरतुदींच्या ८०% रक्कम खर्च करण्यास वित्त विभागाने मान्यता दिली आहे. त्यानुसार लेखाशीर्ष २८५१६५७४ खाली पुरक मागणीव्दारे उपलब्ध झालेल्या रु.१०० लक्ष निधीपैकी रु.८० लक्ष इतका निधी खर्च करण्यासाठी उपलब्ध झाला आहे. या उपलब्ध निधीपैकी रु. ४९ लक्ष इतका निधी संचालक (रेशीम) यांच्या अधीनस्त रेशीम शेती व रेशीम उद्योगाच्या प्रचार प्रसिध्दीसाठी संदर्भाधिन दि.१०.९.२०१८ च्या शासन निर्णयाव्दारे उपलब्ध करून देण्यात आला आहे.

२. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने सादर केलेल्या प्रचाराच्या आराखडयानुसार रेशीम शेती व उद्योगाला चालना देण्यासाठी विविध दृकश्राव्य माध्यमातून करण्यात येणाऱ्या जाहीरातीवरील खर्च भागविण्यासाठी संचालक (रेशीम) यांच्या संदर्भाधिन दि.१६.२.२०१९ च्या पत्राव्दारे प्रस्ताव प्राप्त झाला आहे. या प्रस्तावानुसार आवश्यक बाबींवरील खर्च भागविण्यासाठी रु.१९,९८,८५०/- (अक्षरी रुपये एकोणीस लक्ष अठयान्यव हजार आठशे पन्नास मात्र) इतका निधी संचालक (रेशीम) यांच्या अधिनस्त सुपुर्द करण्यास याद्वारे मंजुरी देण्यात येत आहे.

३. वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेली एकूण रक्कम रु. १९,९८,८५०/- (अक्षरी रुपये एकोणीस लक्ष अठयान्यव हजार आठशे पन्नास मात्र) “ मागणी क्र. व्ही ०२ २८५१- ग्रामोद्योग व लघुद्योग, १०७- रेशीम उद्योग, (०१) विविध सहकारी संस्थांना सहाय्य, (०१) (०१) राज्याचे वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ अंतर्गत रेशीम उद्योगाचा प्रचार व प्रसिध्दी, (दत्तमत) (कार्यक्रम) (२८५१६५७४), २६- प्रचार व प्रसिध्दी "

या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. सदर निधी खर्च करतांना शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थस-२०१८/प्र.क्र.६९/ अर्थ-३, दि. २.४.२०१८ व दि. २५.०१.२०१९ अन्वये निधी वितरणासंबंधी विहीत केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता संचालक (रेशीम) यांनी करावी.

५. सदर निधी कोषागारातुन आहरण व संवितरण करण्यासाठी संचालक (रेशीम) यांना नियंत्रण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/ अर्थ-३ दि. २५.०१.२०१९ नुसार अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेताक क्र. २०१९०३१५१३१११५७१०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashish Anaclet Lopes

Digitally signed by Ashish Anaclet Lopes
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=97c1663938db95bf4b157b5906fb45b17fdf64e8db800c9618de046d6e51497c, serialNumber=4c69f8b7f13f76b97aa93b0d155291c61823c6e1d678a555f6eb04d1a38750cf, cn=Ashish Anaclet Lopes
Date: 2019.03.15 13:12:07 +05'30'

(आ. अ.लोपिस)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर.
२. महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर.
३. कोषागार अधिकारी, नागपूर.
४. अ.मु.स. नियोजन विभाग (कार्यासन-१४३१), मंत्रालय, मुंबई.
५. अ.मु.स. वित्त विभाग (व्यय-२), मंत्रालय, मुंबई
६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
७. सचिव (वस्त्रोद्योग), स.प. व व.वि., मंत्रालय, मुंबई.
८. संचालक (रेशीम), रेशीम संचालनालय, नागपूर.
९. सह सचिव (वस्त्रोद्योग), स.प. व व.वि., मंत्रालय, मुंबई.
१०. उप सचिव (रेशीम), स.प. व व.वि., मंत्रालय, मुंबई.
११. अवर सचिव (१७-स), स.प. व व.वि., मंत्रालय, मुंबई.
१२. अवर सचिव/कार्यासन अधिकारी, टेक्स १(अ) (ब),टेक्स-२,३,४ व ५, स.प. व व.वि., मंत्रालय, मुंबई.
१३. निवड नस्ती (रेशीम).